दै० सकाळ 4/6/2018

ऋचा परांजपे

सौरभ भोपळे

मेरीना जॉन

आकांक्षा ठाणेकर

राजनंदिनी साळोखे

सुशांत चव्हाण

चैतन्य कुलकर्णी

अनिकेत केसरकर

मनिष सुतार

अक्षय राजाज्ञे

गौरव कुंभोजकर

विवेकानंद महाविद्यालयाचे बारावीत यश

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : बारावी परीक्षेत येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. विज्ञान शाखेच्या चैतन्य कुलकर्णीने ९६.७७ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. अनिकेत केसरकर व मनीष सुतार यांनी ९६.१५ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर अक्षय राजाज्ञे व गौरव कुंभोजकरने ९६ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. महाविद्यालयाच्या ६० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळविले.

कला शाखेत आकांक्षा ठाणेकरने ९४.३१ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. राजनंदिनी साळोखेने ९०.४६ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर सुशांत चव्हाणने ८९.३८ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. वाणिज्य शाखेत ऋचा परांजपेने ९४.३० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. सौरभ भोपळेने ९२.९२ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर मेरिना जॉन हिने ९२.१५ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. विद्यार्थ्यांना कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

S

दै० तरुणभारत

2/6/2018

'विवेकानंद'चा शिवाजी विद्यापीठाशी सामंजस्य करार

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील मराठी विभाग व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघामध्ये नुकताच सामंजस्य करार पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या अध्यक्षतेखाली सामंजस्य करार संपन्न झाला.

महाविद्यालयातर्फे विद्यार्थीभिमुख उपक्रम राबविले जाणार

या कराराच्या माध्यमातून विवेकानंद महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघातील स्नेहपूर्ण नात्याचीविण अधिक घट्ट होईल. या करारामुळे विविध विद्यार्थीभिमुख उपक्रम राबविले जातील अशी ग्वाही विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी दिली. याप्रसंगी सेवानिवृत्तीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या वतीने प्रा. डॉ. डी. ए. देसाई यांचा गौरव करण्यात आला. प्रा. डॉ. डी. ए. देसाई यांनी प्रास्ताविकामध्ये संघाच्या स्थापनेपासून आत्तापर्यंतचा कार्याचा आढावा घेतला. आभार प्रा. डॉ. चंद्रकांत पोतदार यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे उपस्थित होते.

दै० तरुणभारत

2/6/2018

प्रमोदिनी जाधव सेट परीक्षा उत्तीर्ण

कोल्हापूर : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या सेट परीक्षेत प्रमोदिनी जाधव यांनी यश संपादन केले आहे. विवेकानंद कॉलेजच्या ग्रंथालय लेखनिक 'ग्रंथालय व माहितीशास्त्र' या विषयातून त्या उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यांना प्रा. संभाजीराव मोरे, डॉ. नमिता खोत, एम. एम. नायकवडी यांनी मार्गदर्शन केले.